सन २०२६-२७ करिता मुख्यलेखाशीर्ष २०५२- सचिवालय सर्वसाधारण सेवा (०९०), सचिवालय (००) (११) ई-गव्हर्नन्स प्रकल्प राबविण्यासाठी सेतू महाराष्ट्र संस्थेला सहायक अनुदान (२०५२ ०५८२) (कार्यक्रम) खालील ३१-सहायक अनुदान (वेतनेत्तर) या तपशीलवार शीर्षाखालील मंजूर अनुदानातून निधी वितरण करणेबाबत.

महाराष्ट्र शासन

इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता विभाग

शासन निर्णय क्र.मागणी-२०२६/प्र.क्र.११३/TECH-१ (E-1811189)

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दि. २१ ऑगस्ट, २०२६

<u>संदर्भ</u> : सामान्य प्रशासन विभाग (मातं), शासन निर्णय क्रमांक. संकीर्ण-१७२४/प्र.क्र.१६२/मातं, दि.२०/०३/२०२६.

<u>प्रस्तावना</u>:

माहिती तंत्रज्ञान संचालनालय तसेच माहिती तंत्रज्ञान कार्यासन यांच्या दालन क्र.७१९ च्या नूतनीकरणाच्या कामाकरिता, वातानुकूलित यंत्रणा बसविणे तसेच विदयुत संच बसविण्याकरिता झालेल्या खर्चास उपरोक्त संदर्भीय शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. सदर बाबींवरील खर्च भागविण्याकरिता निधी वितरित करण्याबाबत वित्त विभागाने दिलेल्या मान्यतेच्या अनुषंगाने सन २०२६-२७ करीता मंजूर अर्थसंकल्पीय तरतुदीतून **रु. ८८,९३,२७०/- (रु.अठठयाऐंशी लाख त्रयाण्णव हजार दोनशे सत्तर फक्त)** इतका निधी वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन निर्णय</u>:

माहिती तंत्रज्ञान संचालनालय तसेच माहिती तंत्रज्ञान कार्यासन यांच्या दालन क्र.७१९ च्या नूतनीकरणाच्या कामाकरिता वातानुकूलित यंत्रणा बसविणे तसेच विदयुत संच बसविण्याकरिता कार्यकारी अभियंता, दक्षिण मुंबई (विदयुत), सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी केलेल्या कामाच्या अनुषंगाने देयक अदा करण्याकरिता होणारा खर्च भागविण्यास सन २०२६-२७ या आर्थिक वर्षाकरीता मंजूर अर्थसंकल्पीय तरतुदीतून **रु. ८८,९३,२७०/- (रु.अठठयाऐंशी लाख त्रयाण्णव हजार दोनशे सत्तर फक्त)** इतका निधी खालील अटींच्या अधीन राहून वितरीत करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

i. प्रस्तावित खरेदी विहित कार्यपध्दत्तीचा अवलंब करुन करण्यात आली असल्याची खातरजमा इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता आयुक्तालयाने करावी.

ii. प्रस्तावित प्रकरणी देयकांची पडताळणी/तपासणी प्रक्रिया पूर्ण करुनच इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता आयुक्तालयाकडून देयके अदा करण्यात यावीत.

iii. सदर खर्चाच्या रकमेची उपयोगिता प्रमाणपत्रे सादर करण्याची जबाबदारी इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता आयुक्तालयाची राहिल.

iv. सदर निधी ज्या प्रयोजनासाठी वितरीत करण्यात येणार आहे, त्याकरिता खर्च करण्याची व निधी वितरीत करताना विहित कार्यपध्दतीचे अनुपालन करण्याची दक्षता इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता आयुक्तालयाकडून घेण्यात येईल.

v. मागणी केलेल्या निधीची रक्कम उचित असल्याची खातरजमा इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता आयुक्तालयाने करावी.

२. इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता आयुक्तालयाने उक्त नमुद बाबींसाठी होणारा खर्च हा नेमून दिलेले "लेखाशिर्ष मागणी क्रमांक ए-४, "मुख्यलेखाशीर्ष २०५२ सचिवालय सर्वसाधारण सेवा (०९०)-सचिवालय (००) (११) ई-गव्हर्नन्स प्रकल्प राबविण्यासाठी सेतू महाराष्ट्र संस्थेला सहायक अनुदाने (२०५२ ०५८२) (कार्यक्रम) खालील ३१-सहायक अनुदाने (वेतनेत्तर)" या उद्दिष्टाखाली खर्ची टाकण्यात यावा. व तो वित्तीय वर्ष सन २०२६-२७ साठी मंजूर केलेल्या अर्थसंकल्पीय अनुदानातून भागविण्यात यावा.

३. सदर निधी वितरीत करण्याच्या अनुषंगाने अधिदान व लेखा कार्यालयातून आहरीत करण्यासाठी उपसचिव, माहिती तंत्रज्ञान यांना नियंत्रक अधिकारी तसेच लेखाधिकारी, माहिती तंत्रज्ञान संचालनालय यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

४. इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता आयुक्तालयाने सदर खर्च करताना वित्त विभागाच्या मार्गदर्शक सुचनांचे काटेकोरपणे पालन करावे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र अर्थसंकल्प नियमपुस्तिका (भाग-१) १९७७ अन्वये प्रशासकीय विभागांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार व वित्त विभागाच्या **अनौ.सं.क्र.४४४/व्यय-४, दि.२२/०७/२०२६** अन्वये दिलेल्या मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्र. २०२६०८२११८२४२३४४११ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने स्वाक्षांकित करून निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

DURGAPRASAD POCHAYYA MYLAWARAM

Digitally signed by DURGAPRASAD POCHAYYA MYLAWARAM
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=EIT and AI, 2.5.4.20=F4FD0AC26AD2A365A8E829907C5E76B911FED9B1B9E48CC2854C4B8A14B0D70C, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=BEFBB0AE84804C4DA8D35ABF2195EBB1DC727DE9B0A094BEA77F4CA6BE5965DB, cn=DURGAPRASAD POCHAYYA MYLAWARAM
Date: 2026.08.21 18:25:14 +05'30'

(दुर्गाप्रसाद मैलावरम)

उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत:

१) सचिव (इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
२) आयुक्त, इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता आयुक्तालय यांचे स्वीय सहायक, मुंबई.
३) उपसचिव (अर्थसंकल्प), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
४) महालेखापाल-१/२ (लेखा व अनुज्ञेयता), (लेखा परीक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर
५) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
६) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
७) वित्त विभाग, कार्यासन अर्थसंकल्प, व्यय-४, मंत्रालय, मुंबई
८) रोखशाखा (३ प्रती), इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता आयुक्तालय, मंत्रालय, मुंबई
९) निवडनस्ती